(७)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, से.बापट रोड,पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/क.अ.तां./झोपुआ/ २५५ /२०१४
दिनांक : १०/०२/२०१४

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (यापुढे यास उक्त अधिनियम असे उल्लेखलेले) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झों.पु.यो- २००४/प्र.क्र. -२१३/झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २ (१९) (बी) मधील तरतुदींनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे नियोजन प्राधिकरण आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी शासनाचे पुर्वमान्यता क्र. झोपुयो-२००४/प्र.क्र. -२१३/ झो.प.सु-१ दि. १८/०८/२००५ नुसार सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना विकसित करण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीसहीत या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना दि. २२/०९/२००५ रोजीच्या राजपत्रात व दै. लोकमत आणि दै. महाराष्ट्र हेराल्ड दि. ०१/११/२००५ रोजी प्रसिध्द करुन जनतेच्या हरकती / सूचना मागविण्यात आलेल्या आहेत. आणि प्राप्त हरकती / सूचनांवर दि. १०/११/२००५ रोजी प्रत्यक्ष सुनावणी घेऊन दि. १५/११/२००५ रोजीचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यतेनुसार सदर सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना विशेष नियमावली सहीत महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी सदर सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या विशेष नियमावलीतील तरतुदींनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी त्यांचे अधिकार क्षेत्रातील सर्व झोपडपट्ट्यांचे सर्व्हेक्षण करुन एकात्मिक पुनर्वसन कार्यक्रम तयार करुन प्रसिध्द करण्याचे आहे.

आणि ज्याअर्थी सदर सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील तरतुदींनुसार झोपडपट्टी व पुनर्वसन क्षेत्र याबाबतची व्याख्या नमुद करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी शासन निर्णय क्र. टीपीएस-१८०८/प्र.क्र. १२४२/०८/नवि-१३ दि. ११/१२/२००८ चे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश पुणे व पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाच्या विशेष नियमावलीसाठी तात्काळ लागु करण्यात

आलेले आहेत. आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेचे निदेश प्राप्त आहेत.

आणि ज्याअर्थी सदर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे विशेष नियमावलीतील तरतुदींनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी त्यांचे अधिकार क्षेत्रातील सर्व झोपडपट्टयांचे सर्व्हेक्षण करुन एकात्मिक पुनर्वसन कार्यक्रम तयार करुन प्रसिध्द करण्याचे आहे.

आणि ज्याअर्थी शासनाकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सहाय्य समितीची दि.५/२/२००९ रोजी मान्यता व शासन पत्र क्र.टीपीस/१८११/१५३/प्र.क्र.२३/११/नवि-१३, दिनांक १९/७/२०११ अन्वये सदर नियमावलीस झो.पु.प्रा. समितीने काही बदल करुन मान्यता दिली असल्याचे व त्यापुढील कार्यवाही करण्याचे कळविणेत आलेले आहे.

आणि ज्याअर्थी या शासन पत्रातील प्रपत्राप्रमाणे प्रारुप विकास नियंत्रण नियमावली तयार करुन ती उक्त अधिनियमाच्या कलम ३७-१-(ख) अन्वये क्र.एसआरए/डीसीआर/१४६५/ दि.२७/७/२०११ रोजी प्रसिद्ध केली आहे. त्यासंबंधीची नोटीस इंग्रजीमध्ये टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी वृत्तपत्रात दिनांक ३०/७/२०११ तर "सकाळ" या मराठी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच सदर सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, पुणे विभाग, भाग-१, पुरवणीमध्ये पान क्र.२५८० ते २५८२ पर्यंत दि.४/८/२०११ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. यावरील प्राप्त हरकती / सूचनांवर समक्ष सुनावणीत संबंधीताचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे.

आणि ज्याअर्थी झो.पु.प्रा. समितीच्या ठरावामध्ये नागरिकांच्या हरकती सुचना ऐकून व त्यावर अहवाल सादर करण्याचे अधिकारात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर विशेष नियमावली अहवालासहीत शासनाकडे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये अंतिम मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्व घोषित / अघोषित गलिच्छ वस्त्यांमध्ये झोपडपट्टी सुधारणा पुनर्वसन प्रकल्प राबविण्यासाठी नियोजन करणे कामी सर्व झोपडपट्टयांचे भुकर, सर्वेक्षण, सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण विहित गणना पत्रक भरणे, सर्व माहिती व नकाशा संकलित करुन त्यांचे पुर्ण संगणकीकरण करणे इत्यादी प्रकारचे कामकाज सर्वेक्षणाची संपूर्ण माहिती व नकाशे जी.आय. लिकेंजसह डेटा एन्ट्री करुन एम.आय.एस. अहवाल तयार करण्याचे काम निविदा पध्दतीने पुणे महानगरपालिका व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी निवडलेल्या व नेमलेल्या मशाल संस्थे मार्फत करणेत आलेले आहे. यानुसार पुणे शहरातील सर्व झोपडपट्टी व्याप्त क्षेत्रांचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले असुन त्याचा तपशीलवार अहवाल पुणे स्लम ॲटलास (Slum Atlas) स्वरुपात तयार करुन दि. २५/११/२०१२ रोजी प्रकाशित करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व पुणे महानगरपालिकेच्या राजीव आवास योजनेच्या कक्षामार्फत पुणे शहरातील सर्व विभागीय स्तरावर घेण्यात आलेल्या कार्यशाळेनंतर शहरातील सर्व प्रभाग अधिका-यांच्या मदतीने शहराचे उपग्रह छायाचित्र व जी.आय.एस. नकाशा व प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती या सर्वांची माहिती एकत्र करुन पुणे

शहरातील प्रभाग निहाय झोपडपट्ट्यांची यादी, झोपडपट्ट्यांचे भुकर, सर्वेक्षण, सामाजिक व आर्थिक सर्वेक्षणाचे नकाशे व झोपडपट्टीचे स्थान, झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र, अंदाजित झोपडयांची संख्या, सर्वसाधारणतः खाजगी किंवा सार्वजनिक मालकी बाबत तपशील व विकास आराखडयातील जमिन वापर या सर्व तपशीलासहीत मशाल संस्थेने अहवाल संकलित करुन दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी तसेच प्राप्त सर्व्हेक्षणानुसार पुणे महानगरपालिकेने पुणे शहर (जुनी हद्द) सुधारित विकास आराखडयात त्याचा अंमल दर्शवून प्रारुप विकास आराखडा प्रसिध्द केलेला आहे.

आणि ज्याअर्थी आता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्रापैकी पुणे शहरातील घोषित झोपडपट्ट्यांचे यादी व राजपत्र तसेच सर्व झोपडपट्ट्यांचे मशाल संस्थेकडून सर्व्हेक्षण अहवाल प्राप्त झालेले आहेत. आणि सदर क्षेत्रांसाठी एकात्मिक पुनर्वसन कार्यक्रम राबविणेसाठी उक्त अधिनियमाखाली सर्व साधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये तात्काळ लागु करण्यात आलेली विशेष नियमावली उपलब्ध आहे.

आणि ज्याअर्थी सोबत सर्व घोषित तसेच गणनाकृत (सार्वजनिक मालकीच्या मिळकतीवरील झोपडपट्टया) मिळकतींवर झोपडपट्टी असल्याने सदरची क्षेत्रे ही झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये पुणे शहरातील (i) कलम ४ अन्वये पुणे शहरातील सर्व घोषित झोपडपट्टी क्षेत्रे आणि (ii) सार्वजनिक मिळकतीवरील गणनाकृत झोपडपट्टी क्षेत्रे यांसाठी ही झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून खालील नमुद अटींस अधिन राहुन घोषित करीत आहे. सदर क्षेत्रांवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विशेष नियमावलीतील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना जमिन मालकी, जमिनीचे नगर भूमापन क्षेत्र जमिन बांधकाम योग्य-अयोग्यता, उक्त अधिनियमानुसार लाभार्थींची पात्र-अपात्रता यास अधीन राहुन विहीत पध्दतीने दाखल करण्यास पात्र आहेत.

१) सदर आदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे केवळ पुणे शहर (नवीन व जुनी मनपा हद्द) क्षेत्रातील उक्त अधिनियमाचे (i) कलम ४ अन्वये पुणे शहरातील सर्व घोषित झोपडपट्टी क्षेत्रे आणि (ii) सार्वजनिक मिळकतीवरील गणनाकृत झोपडपट्टी क्षेत्रे यांसाठी पारित करणेत येत आहे. यामधील ज्या क्षेत्रांवर यापूर्वीच पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेत आलेले आहेत वा पुनर्वसन प्रस्ताव मंजुर आहेत ती वगळुन सदर आदेश जारी करणेत येत् आहे.

२) पुणे शहरातील झोपडपट्ट्यांसाठी एकात्मिक पुनर्वसन कार्यक्रम राबविणेकामी उक्त अधिनियमानुसार व प्रचलित विशेष नियमावलीनुसार अधिकार क्षेत्रासाठी सदर क्षेत्रांचे

जमिन मालकी हक्क व विकास आराखडयातील जमिन वापराचा संदर्भ लक्षात न घेता सदर आदेश प्रसिध्द करणेत येत आहे.

३) उक्त अधिनियम व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विशेष नियमावलीतील तरतुदींनुसार यानंतर जमिन मालक, नोंदणीकृत विकसकामार्फत विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसहीत प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सादर करु शकतील. प्रसिध्दीपासून ९० दिवसांत प्रस्ताव प्राप्त न झाल्यास उक्त अधिनियम व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विशेष नियमावलीतील तरतुदींनुसार घोषित क्षेत्रातील झोपडपट्टी व्याप्त मिळकती संपादन करणेचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांना प्राप्त आहेत.

४) सदर पुनर्वसन क्षेत्र आदेशात समाविष्ट (i) कलम ४ अन्वये पुणे शहरातील सर्व घोषित झोपडपट्टी क्षेत्रे आणि (ii) सार्वजनिक मिळकतीवरील गणनाकृत झोपडपट्टी क्षेत्रे यांसाठी पुणे स्लम ॲटलास, पुणे महानगरपालिकेकडून प्राप्त घोषित गलिच्छ वस्त्यांची यादी व महाराष्ट्र शासन राजपत्रे आणि प्रसिध्द प्रारुप पुणे विकास आराखडयात नमूद आहेत. यामधील झोपडपट्टयांची यादी व माहिती अंदाजित व प्राथमिक असुन त्यामध्ये आवश्यकतेनुसार दुरुस्ती / सुधारणा प्रस्तावानिहाय पुरवणी आदेशानुसार करणेत येईल.

५) यानंतर विहीत नमुन्यात दाखल प्राप्त प्रस्तावांवर छाननी करुन मालकी हक्क जमिन वापर, शासन धोरणानुसार पात्र-अपात्रता यादी, नगर भूमापन व झोपडी क्षेत्र निश्चितता तपासुन प्रस्तावनिहाय "निर्मुलन आदेश" उक्त अधिनियमाचे कलम ३ ड नुसार पारित करणेत येतील.

६) तथापि, यापैकी सार्वजनिक / सरकारी / निमसरकारी मालकीचे मिळकतींवरील झोपडपट्टयांवरील पुनर्वसन योजना प्रस्ताव अंमलबजावणी बाबत शासनाकडून अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतरच त्या निर्णयानुसार करता येईल. सदर आदेशामुळे कोणत्याही सार्वजनिक मालकीच्या मिळकतींवरील झोपडपट्टयांचे पुनर्वसन प्रस्ताव मान्यता नसून सदर क्षेत्रे केवळ पुनर्वसन क्षेत्र म्हणुन घोषित करणेत येत आहेत.

७) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार व शासनाचे वेळोवेळी होणा-या निर्णयानुसार पात्र लाभार्थीचे विहीत पध्दतीने निश्चिती विकास आराखडयानुसार जमिन वापर / आरक्षण / विभाग झोन प्रमाणे त्याच जागेवर वा स्थलांतरीत वा संमिश्र प्रस्तावांतर्गत वा एकत्रित प्रस्तावांतर्गत पुनर्वसन करणे शक्य आहे.

८) तथापि, सदर पुनर्वसन आदेश म्हणजे प्रस्ताव मान्यता नसुन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पुणे शहराचे अधिकार क्षेत्र एकात्मिक नियोजन मास्टर प्लॅनसाठी असुन प्रस्तावनिहाय मान्यतावर नमुद विहीत पध्दतीनेच करणेत येईल.

९) सदर क्षेत्रांतील झोपडपट्टयांसाठी आवश्यक सुधारणा कामे व देखभाल दुरुस्ती अशा क्षेत्रांचे निर्मुलन आदेश पारित होईपर्यंत पुणे महानगरपालिकेकडूनच करणेत येईल.

१०) सदर आदेशातील क्षेत्रांपैकी अंशत: किंवा पुर्णत: क्षेत्राबाबत वा आदेशाबाबत कोणताही कायदेशीर / न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दाखल

झालेल्या / होणा-या प्रस्तावांबाबत प्रस्तावनिहाय पुनर्वसन आदेश व निर्मुलन आदेश पारित करणेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे अधिकार अबाधित राहतील.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

सदर आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत येत आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

(महेश पाठक)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

दिनांक - १०/०२/२०१४
पुणे.